माफसु

# यशोगाथा





MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR

प्रकाशन वर्ष-२०१८



# माफसु यशोगाथा

## संरक्षक

प्रा. ए. एम. पातुरकर

कुलगुरु

## संपादकीय मंडळ

डॉ. ए. पी. सोमकुंवर

संचालक, विस्तार शिक्षण व प्रशिक्षण

डॉ. जी. व्ही. दुमे

तांत्रिक अधिकारी

डॉ. एस. पी. लांडगे

सहा. प्राध्यापक, विस्तार शिक्षण व तांत्रिक अधिकारी

श्री. पी. एम. बागडे

कनिष्ठ लघुलेखक

## शब्दांकन


श्री प्रभाकर सोमकुवर

कवि समिक्षक, नागपूर


◂ प्रकाशक ▸

विस्तार शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर- ४४० ००१







# जलाशयातील शाश्वत मत्स्यव्यवसायातून उद्योजकता विकास

जिद्दीच्या बळावर चंदु पाटील नावाचा उच्चशिक्षित युवक विदर्भातील मत्स्यव्यवसायामध्ये नेत्रदिपक यश मिळवत आहे. द्योगातून स्वयंरोजगाराची कास धरू पाहणाऱ्या युवकांना प्रेरणादायी ठरावे असे मोलाचे काम हा युवक विदर्भामध्ये करतो आहे, हे भिमानास्पद आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर चालून आलेली नोकरीची संधी झुगारून त्यांनी उद्योजक होण्याचे ठरविले. नोकरीतून मप्राप्त असलेली दुसऱ्याची गुलामी करण्यापेक्षा उद्योजक होऊन अर्थाजन करण्यासाठी आणि स्वत:चा वेळ भरीव कार्याकरीता तीत करण्याकरीता त्यांनी स्वबळावर मत्स्यव्यवसायात पदार्पण केले. मत्स्यव्यवसाय हा एक फायदेशीर व्यवसाय असून शेतीला क मुख्य व्यवसाय अशा दोन्ही पद्धतीने करता येतो, हे त्यांनी जाणले. या व्यवसायात उद्योजकतेला असलेली प्रचंड संधीही त्यांनी ळखली.

राज्य शासनाच्या कृषि विकास योजनेंतर्गत १०० X १०० फुट आकाराचे शेततळे वडीलोपार्जित शेतीत खोदून त्यांनी त्स्यसंवर्धनास सुरूवात केली. यावेळी शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्यसंवर्धन कसे करावे, याविषयीचे मार्गदर्शन त्यांना महाराष्ट्र पशु व त्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथिल तज्ञांकडून मिळाले. शेततळ्यातील त्स्यसंवर्धनातून मिळालेला नफा आणि अनुभव या आधारावर गावाशेजारील पाझर तलाव तसेच जिल्हा परिषद अंतर्गत असलेले ही लहान तलाव भाडेपट्टीवर घेऊन त्यामध्ये मत्स्यसंवर्धनावर आधारीत व्यवसायात त्यांनी जम बसवला. पूर्वापार परंपरागत द्धतीने करण्यात येत असलेल्या या व्यवसायामध्ये मत्स्य जिऱ्याच्या ऐवजी मत्स्य बोटुकली आकाराच्या बिजांचे संचयन, माशांसाठी त्रीम खाद्याचा वापर आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन या शास्त्रीय बाबींचा त्यांनी कटाक्षाने अवलंब केला. प्रारंभी छोट्या रूपात सुरूवात केलेल्या मत्स्यव्यवसायास अधिक वृद्धींगत करण्याची संधी त्यांना लवकरच मिळाली. राज्य शासनाने लाशयातील मत्स्यव्यवसायामध्ये खासगी उद्योजकतेला चालना देण्याचे ठरविले आणि या योजनेअंतर्गतच त्यांनी विदर्भातील र्धा जिल्ह्यात येथे अस्तित्वात असलेला सुमारे २००० एकर आकाराचा बोरधरण जलाशय महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडून २०१६ ते २०२१ या कालावधीकरीता 'जलाशयामध्ये बंदिस्त पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धन व खुले मासेमारी करीता डेपट्टीवर घेतला.

पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धनासाठी मुख्यत: ६ X ४ X ५ मिटर आकाराचा आणि एच.डी.पी.ई. जाळीचा पिंजरा उपयोगात . प्रत्येक पिंजऱ्यामध्ये सुमारे ३० ग्रॅम वजनाचे तिलापीया अथवा पंगॅसिअस माशांचे बिज प्रति पिंजरा ४,००० बोटुकली या णात संचयीत करण्यात येते. ३१ ते १०० ग्रॅम वजनाच्या बोटुकल्यांसाठी २ मि.मि. आकाराचे तयार मत्स्यखाद्य नंतर १०१ ते ०० ग्रॅम पर्यंत वजनाच्या माशांना ३ मि.मि. आकाराचे खाद्य आणि त्यापुढील वजनाच्या माशांकरीता ४ मि.मि. आकाराचे ासरी २२ ते ३२ टक्के प्रथिने असलेले तरंगते तयार मत्स्यखाद्य वापरण्यात येते. पुरक खाद्यामुळे माशांची जलद वाढ होते आणि योजकांना चांगला आर्थिक लाभ होतो. साधारणत: १० महिन्याच्या कालावधीत तिलापीया माशांची ५०० ते ७५० ग्रॅम आणि ंगॅसिअसची ७५० ते १००० ग्रॅम अशी वाढ अपेक्षित असते. माशांची वाढ बाजारातील मागणीनुसार झाल्याची खात्री केल्यावर ऊक विक्रेत्यांशी चर्चा करून योग्य भाव मिळाल्यास मासेमारी करून माशांची विक्री केली जाते. या योजनेत मोठा प्रकल्प ल्यास स्थानिक मासेमारांना मुलभूत सुविधा उदा. ५ टन बर्फ कारखाना, शितगृह, मत्स्यविक्री केंद्र, शितवाहन इत्यादि बाबी लब्ध होऊ शकतात.

पिंजरा पध्दतीतील सर्वात खर्चिक बाब म्हणजे पिंजरा बांधणी. व्यवसाय म्हटला तर आर्थिक बाजु भक्कम असणे गरजेचे ाते. परंतु त्यांनी कशाचीही तमा न बाळगता हे साध्य केले. पिंजऱ्यातील संवर्धनासाठी माशांना कृत्रिम तरंगणारे मत्स्यखाद्य







माशांच्या वजनाच्या प्रमाणात दोन किंवा तीन समभाग करून दिवसातून दोन किंवा तीन वेळा देणे, पंधरा दिवसाच्या फरकाने माशांची वाढ तपासणे व त्यानुसार खाद्य व्यवस्थापन करणे, पिंजऱ्याच्या जाळीला लागलेले शेवाळ व कवचधारी प्राणी साफ करणे आणि मासोळीवर रोगांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास तज्ञांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार करणे, या बाबी ते मत्स्य व्यवसायीकांना आवर्जुन सांगतात.

पाटील यांनी जलाशयांमध्ये माशांचे संवर्धन या संकल्पनेवर आधारीत सुधारीत मत्स्यव्यवसायाचा अंगीकार केल्यामुळे त्यांना वैयक्तिक लाभ झाला आहेच, शिवाय तेथील स्थानिक ६०० ते ७०० लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. मच्छिमारांना मासेमारीचे सुधारीत तंत्रज्ञान अवगत व्हावे यादृष्टीने जाळी बांधणी, जाळी वापरण्याच्या पद्धती व लाईफ जॅकेटस्‌चा वापर याविषयाचे प्रशिक्षणही देण्यात येते. तलावामधील हंगामी मत्स्य व्यवसायाचे स्वरूप आज त्यांच्या प्रयत्नांमुळे पूर्णकालीन आणि वर्षभर उत्पन्न देणारा व्यवसाय, असे झाले आहे. यामुळे स्थानिक लोकांना उपजिविकेसाठी इतरत्र भटकण्याची गरज वाटत नाही. मासे प्रथिनयुक्त खाद्य असल्यामुळे मागासभागातील कुपोषणग्रस्तांना सकस आहाराची उपलब्धता या व्यवसायामुळे वाढली आहे.

मत्स्यबिजासाठी बाहेरील राज्यांवर अवलंबून राहावे लागते. यावर पर्याय म्हणून त्यांनी स्वत:च मत्स्यबिज निर्मिती क्षेत्रात उतरण्याचे ठरविले आहे. जेणेकरून त्यांच्याकडील जलाशयांमध्ये संचयनासाठी आवश्यक मत्स्यबिज उपलब्ध होऊ शकेल आणि इतर व्यवसायीकांनाही ते पुरवता येईल. मासेमारी केल्यानंतर माशांना तात्काळ बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी न्यावे लागते, ज्यामध्ये उत्पादकांना बाजारभावाशी तडजोड करावी लागते. ही समस्या ओळखून जलाशयालगतच शितगृहाची उभारणी तसेच मासे वाहतूकीसाठी शितवाहनाची सोय करण्याचे त्यांनी ठरविले आहे. गोड्या पाण्यातील माशांची महाराष्ट्रात इतरत्र आणि बाहेरील राज्यात विक्री व निर्यात करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे. आजच्या घडीला त्यांना या व्यवसायात भरभरून प्रतिसाद मिळत आहे व भविष्यात या उद्योगाला क्लस्टर व मोठया इंडस्ट्रीजचे रूप देवून मोठया प्रमाणात ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा संकल्प आहे.

महाराष्ट्राच्या एका लहानशा खेडयातील शेतकरी कुटुंबातुन आलेला एक सर्वसामान्य तरूण केवळ दुर्दम्य आत्मविश्वास, प्रचंड इच्छाशक्ति आणि जिवापाड मेहनत करण्याची तयारी या बळावर एवढे मोठे यश मिळवतो हे खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांनी शुन्यातून विश्व निर्माण केलं ते त्यांच्या अपार कष्टातून व जिद्दीतून. ही केवळ एका यशस्वी मत्स्यव्यवसायीकाची गाथा नसून काहीच हाती नसतांना आणि कोणतीही पार्श्वभूमी नसतांना केवळ जिद्दीच्या जोरावर मत्स्यव्यवसायामध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेल्या युवा उद्योजकाची यशोगाथा आहे. उपरोक्त प्रकल्पाकरिता ज्यांनी-ज्यांनी त्यांना प्रोत्साहित केले त्या सर्वांचे ते ऋणी आहेत. भविष्यात औद्योगिक स्वरूपाचा मत्स्यव्यवसाय प्रकल्प उभा करण्याचा त्यांचा मानस आहे.

श्री. चंदु दौलतराव पाटील
रा. धानोली ता. कारंजा (घा) जि. वर्धा

**मार्गदर्शक :**
**डॉ. प्रशांत ए. तेलवेकर**
**सहाय्यक प्राध्यापक,**
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर








**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर**

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर ४४० ००१

फोन नं : ०७१२–२५११७८४,२५११७८५

फॅक्स : ०७१२–२५११२८२,२५११२७३

ईमेल : registrarmafsu@yahoo.com संकेतस्थळ : www.mafsu.in

टोल फ्री क्र. : १८००–२३३–३२६८